# राजकारणाचे बदलते स्वरूप

**डॉ. शेषनारायण वडवे,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आपण आजपर्यंत चालू असलेले राजकारण पाहिले तर त्याचे मुद्दे कदाचित तेच आहेत असे लक्षात येईल. पण २०१४ नंतरच्या निवडणुकांचा विचार केल्यास देशाच्या राजकारणाचा संपूर्ण कायापालटच करून टाकला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. गेल्या काही वर्षांमध्ये संपूर्ण राजकारणाचे स्वरूप बदलले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राजकारणाची गणितं बदलताना दिसून येत आहेत. यासाठी सर्वात जास्त जबाबदार ठरली ती २०१४ ची निवडणूक होय. बदलते राजकारण युवकांसाठी फायदेशीर संधी ठरत आहे. आता बघायला गेलं तर राजकारणात जास्त प्रमाणात युवक येऊ लागले आहेत. केवळ राजकारण करण्यासाठी नाही तर समाजसेवेसाठीही युवक आता पुढे येऊ लागले आहेत. शासकीय कामकाज कसे चालायला हवे यावरही राजकीय पक्ष आता वेळ काढू लागले आहेत. याकडे विशेष लक्ष देण्यासाठी युवकांची नियुक्ती होत आहे. रोज काही ना काही राजकीय पक्षांमध्ये घडत असते आणि त्याची माहिती जास्तीत जास्त लोकांमध्ये पोहचवण्यासाठी सोशल मीडियाचा चांगला उपयोग करून घेता येत आहे. हे काम अतिशय जबाबदारीचे आणि तितकेच जोखमीचेही आहे. कारण खरी माहिती, फोटो आणि गोष्टी जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम असते. यामुळे राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात उलथापालथ होत असते. राजकारण म्हणजे काही खायचे काम नाही हे नक्की.

राजकारणात रोज काही ना काही घडत असते. प्रत्येकावर वेगवेगळ्या प्रकारे चिखलफेक होत असते. ती झेलायची आणि तितक्याच ताकदीने समोरच्या पक्षाला उत्तर द्यायची तयारी ही प्रत्येक नेत्यामध्ये असावी लागते. उठसूठ कोणीही नेता होऊ शकत नाही. कोणत्या क्षणी कोणावर पलटवार करायचा याचीही माहिती आणि तितकी क्षमता असावी लागते. त्यामुळे आताच्या राजकारणामध्ये अनेक नेते कसलेले असले तरीही त्यांना टक्कर देण्यासाठी युवा पिढीही तयार होताना दिसून येत आहे. साधारण तीन दशकांपूर्वी असणारे राजकारण हे ज्या प्रकारचे होते ते लक्षात घेतले तर विरोधी पक्षांची आघाडी ही अपरिहार्य होती. पण आताचे राजकारण पाहता सर्वच बदलले असल्याचे लक्षात येत आहे. या बदललेल्या राजकारणातील स्वरूपामुळे सर्जनशील काम करणाऱ्या लोकांसाठीही या क्षेत्रामध्ये आता संधी उपलब्ध झाल्या आहेत. राजकीय पक्ष आणि नेते यांना पुढे येण्यासाठी विविध आणि हुशार लोकांची गरज भासू लागली आहे. अनेक घोषवाक्य तयार करण्यापासून ते कोणत्या रंगाचे कपडे कोणत्या सभेसाठी घालायचे काय बोलायचे या सगळ्यासाठीच आता नवनवीन एजन्सी अथवा पीआरची मदत घेण्याचे कामही गेल्या काही वर्षांमध्ये वाढले आहे. कोणत्या सभेत कोणत्या देहबोलीत बोलायचे, भाषेचा वापर कसा सुयोग्य करायला हवा या सगळ्याचा विचार अगदी योग्य तऱ्हेने करण्यात येतो. राजकारण हादेखील आता बदलून एक प्रकारचा व्यवसाय झाल्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यामध्ये याची गरज नक्कीच वाढत जाणार आहे.

राजकारणाच्या या बदलत्या स्वरुपामुळे आता याकडे एक करिअर म्हणूनही पाहिले जाऊ लागले आहे. अगदी महाविद्यालयातील राजकारणही गेल्या काही वर्षांमध्ये वाढले असून तरूण पिढी यामध्ये भाग घेऊ लागली आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त प्रमाणात युवा पिढी राजकारणात टेक ओव्हर करत असल्याचेही दिसून येत आहे.

**राजकारणाचे बदलते स्वरूप :**

गेल्या काही वर्षांमध्ये आपण राजकारणाचे बदलते स्वरूप पाहात आहोत. त्याचे सर्वात मोठे कारण जर काही असेल तर सोशल मीडियाचा वाढता वापर. राजकारण सध्या व्यावसायिकतेकडे जास्त प्रमाणात झुकत आहे आणि त्याला कारणीभूत ठरत आहे बदललेले तंत्रज्ञान, मतदार, वाढलेल्या अपेक्षा. गेल्या काही वर्षांमध्ये राजकारणाची गणितं बदलताना दिसून येत आहेत. यासाठी सर्वात जास्त जबाबदार ठरली ती २०१४ ची निवडणूक. यासाठी सर्वात महत्त्वाचं काम केलं आहे ते सोशल मीडियाने. काही प्रमाणात सुशिक्षित वर्ग राजकारणापासून अलिप्त झाला होता पण आता सोशल मीडियाच्या माध्यमातून पुन्हा एकदा तरूण पिढीदेखील राजकारणात जास्त रस दाखवू लागली आहे. अनेक ठिकाणी घडणाऱ्या घटना, त्यावर तरूणांची राजकीय घोषवाक्य, विनोद, मिम्स आणि व्हिडिओ या सर्वच गोष्टींनी अक्षरशः राजकारणाची नोंद घेण्यास भाग पाडलं आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये सर्वच राजकीय पक्ष आणि नेते हे सामाजिकदृष्ट्या अधिक ॲक्टिव्ह झालेले पाहायला मिळत आहे. त्यामुळेच राजकारणाचे स्वरूपही बदलत आहे. खर्या अर्थाने पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीने सर्व उलथापालथ केली. यामध्ये सर्वात मोठा वाटा होता तो फेसबुक, ट्विटर, व्हॉट्स अप यासारख्या सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांचा. कोणते फोटो कधी पोस्ट करायचे त्याखाली काय लिहायचे, काय ट्रेंडिंग करायचे, लोकांना आपल्याकडे कसे आकर्षित करून घ्यायचे हा सर्व सोशल मीडियाचा खेळ खऱ्या अर्थाने राजकारणामधील बदलासाठी पूरक ठरला.

राजकीय पक्षांची निर्मिती काही विचारधारेवर झालेली असते. ती विचारधारा ज्यांना आवडते ते त्या पक्षात काम करतात. त्यात बहुमताने येणारे पक्ष सत्तेत बसून देशावर राज्य करतात, ज्या राजकीय पक्षात आपण काम करतो, त्या प्रत्येक पक्षाला स्वत:चे तत्वज्ञान, विचारधारा असते. ती मान्य असली तरच आपण तिथे जावे हा राजकीय संकेत आहे. मात्र सध्या देशात राज्यात सुरु असलेल्या राजकीय घडामोडी, उलथापालथ पाहता पक्षनिष्ठा, विचारधारा याचा काहीही संबंध दिसत नाही. वास्तविक पक्षनिष्ठा, विचारधारा लोप पावताना दिसते. पूर्वीच्या आणि आताच्या राजकारणामध्ये बराच फरक झालेला दिसून येत आहे. पूर्वीच्या राजकारणात एकदा एका पक्षात गेले की त्या पक्षाला शेवटपर्यंत धरून ठेवण्यातच धन्यता होती. आता मात्र समाजकारणासह राजकारण करत स्वतःचे खिसेही तितकेच भरण्यात काही राजकारणी धन्यता मानत असल्याचे दिसून येत आहे. केवळ इतकेच नाही तर आपल्याला हव्या असणाऱ्या पदासाठी कधीही कोणत्याही पक्षामध्ये पक्षांतर करण्यासाठीही आताचे नेते आघाडीवर असल्याचे दिसून येत. गेल्या दहा वर्षात अनेक नेत्यांनी सतत पक्षांतरे केलेली दिसून आली आहेत. कदाचित याचमुळे राजकारणाचे स्वरूप जास्त प्रमाणात बदललेले दिसून येत आहे.

भारतातील निवडणुकीच्या हंगामात गरिबांना मोफत भेटवस्तू देण्याच्या आश्वासनांचे वर्चस्व राहिले आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या निवडणुकीत गरीबी हटाव और देश बचाओ हा नारा दिला होता, तर आज भारतातील कोणताही राजकीय पक्ष गरिबी हटाव करण्याबद्दल बोलत नाही. ते असंख्य मोफत भेटवस्तू देऊन गरिबांची मते त्यांच्या बाजूने वळवण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करत आहेत. या मोफत देणग्यांमध्ये मोफत पाणी, वीज, रेशन, लॅपटॉप, सायकली, गॅस सिलिंडर, सार्वजनिक वाहतूक इत्यादी आश्वासनांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांनी शासित राज्य सरकारांनी दिलेल्या मोफत देणग्यांवर जोरदार टीका केली आणि त्यांनी या पद्धतीला रेवडी संस्कृती म्हटले. परंतु मध्य प्रदेशातील भाजप सरकार बहुचर्चित लाडली बहना योजनेतंर्गत प्रत्येक महिलेला १,००० रुपये वाटप करत होते. रक्षाबंधन सणाच्या काही दिवस आधी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ही रक्कम १००० रुपयांवरून १२५० रुपये प्रति महिना केली. मुख्यमंत्र्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांसाठी ३५ टक्के आरक्षणाची घोषणा केली आणि ऑगस्टमध्ये महिलांना ४५० रुपयांना स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर देण्यात येईल असे सांगितले. दुसरीकडे, कर्नाटकात केल्याप्रमाणे जादू चालविण्याच्या आशेने काँग्रेसने महिलांना ५०० रुपयांना गॅस सिलिंडर देण्यासोबतच मासिक १,५०० रुपये देण्याची घोषणा केली. छत्तीसगडमधील निवडणूक सभेत मोदींनी केलेली घोषणा आश्चर्यकारक आहे की त्यांचे सरकार पुढील पाच वर्षांत भारतातील ८० कोटी लोकांना ५ किलो धान्य (प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना) मोफत वाटप सुरू ठेवेल. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे सरकारने २०२४ ची विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहिण योजना, वयोश्री योजना, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सूट इ. माध्यमातून मतदारांना एक प्रकारे अमिश दाखवून सत्ता हस्तगत केली.

सरकारच्या अशा मोफत देणग्यांमुळे राज्य आणि देश अतिभारग्रस्त होत आहे. उदा. केंद्रीय अन्न मंत्री पियुष गोयल यांच्या मते, ८० कोटी लोकांना वर्षभर मोफत धान्य वाटण्याच्या योजनेसाठी २ लाख कोटी रुपये खर्च येईल. भारतातील राजकीय पक्षांनी स्वतःला विचारले पाहिजे की गरिबांचे रक्षण करण्याच्या नावाखाली मोफत सुविधांचा विस्तार करणे हा गरिबीच्या समस्येला तोंड देण्यासाठी योग्य दृष्टिकोन आहे का ? अर्थव्यवस्थेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून मोफत देणे हा एक धोकादायक शॉर्टकट असू शकतो. गरिबांना नेहमीच गरीब ठेवण्याची ही एक रणनीती देखील असू शकते. प्रसिद्ध पत्रकार श्रावण गर्ग यांनी त्यांच्या अलीकडील एका लेखात एक अतिशय योग्य मुद्दा मांडला आहे. “गरिबांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली, नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याऐवजी, नागरिकांना निष्क्रिय करण्यासाठी, त्यांचे तोंड बंद करण्यासाठी, प्रतिकाराचा आवाज दाबण्यासाठी आणि सरकारच्या स्वतःच्या राजकीय सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी मोफत सुविधांचा विस्तार केला जात आहे. हा रेवडी संस्कृतीचा खेळ खऱ्या अर्थाने राजकारणामधील बदलासाठी पूरक ठरला आहे.

राजकारणात काही प्रमाणात महिलांचे नेतृत्व आणि त्यांचाही सहभाग राजकारणात वाढल्याने एक वेगळी दिशा मिळाली आहे. महिला आणि पुरूष एकमेकांच्या मदतीने राजकारणात भाग घेऊन समाजाला जास्तीत जास्त चांगले करण्याचा प्रयत्न करत आहेत असेही दिसून येते. तर काही ठिकाणी केवळ राजकारण करून परिस्थिती बिघडत असल्याचेही दिसून येते. पण त्याचा अर्थ राजकारण करूच नये असा होत नाही. तर यामुळेच राजकारणामध्ये बदल घडला असून त्याचे स्वरूप बदलल्याचे दिसून आले आहे.

लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रभावी व कार्यक्षम विरोधी पक्ष असावा लागतो. ज्या देशामध्ये विरोधी पक्ष नसतो तेथे लोकशाही असत नाही. विरोधी पक्षाची आवश्यकता भासत नसलेल्यांना लोकशाही काय चीज आहे; याचे संपूर्ण आकलन झालेले नसते. डॉ. आंबेडकर म्हणतात, “लोकशाहीमध्ये दोन तुल्यबळ पक्ष असावे लागतात. शासन चालविण्यासाठी सत्ताधारी पक्ष असावा लागतो. पण ते शासन हुकूमशाही व्हावयाचे नसेल तर किमान दोन पक्ष असावे लागतात. सत्ताधारी व

विरोधी पक्ष असे दोन पक्ष असल्याशिवाय लोकशाही अस्तित्वातच येऊ शकणार नाही." लोकशाही जीवंत ठेवण्यामध्ये विरोधी पक्षाची महत्त्वाची भूमिका असते. विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यावर अंकुश ठेवतात. ते सत्ताधाऱ्याच्या समाजविरोधी व चुकीच्या धोरणांना कडाडून विरोध करतात व सत्ताधाऱ्यांना लोकहिताचे काम करण्यासाठी भाग पाडतात. त्यांच्यामुळे नागरिकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षण होते. शासन चालविण्यासाठी पक्ष असावा लागतो. मात्र शासनात एका पक्षाची सत्ता सतत राहिली तर तो पक्ष हुकूमशाहीकडे वाटचाल करू शकतो.

देशाला हुकुमशाहीपासून दूर ठेवण्यासाठी दोन पक्ष असावे लागतात. राष्ट्रऐक्य वा अन्य कोणत्याही कारणास्तव एकपक्षीय पद्धतीचा स्वीकार करता कामा नये. एकपक्षीय शासन हे जुलूमशाहीला निमंत्रणच असते. लोकांच्या शासनाला ते मारकच असते. निवडणुकीच्या मार्गाने जरी तो एकमेवाद्वितीय पक्ष सत्तारूढ झाला तरी, तेवढ्याने हुकूमशाहीला पायबंद बसण्याची मुळीच हमी मिळत नाही. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे महत्त्व लक्षात घेता पाश्चात्त्य राष्ट्रांत देखील विरोधी पक्षांना अत्यंत सन्मानाने वागविले जाते. परंतु आज आपल्या देशात विरोधी पक्षाला सन्मानाने वागविले जात नाही. विरोधी पक्षातील सदस्यांना सत्ताधारी एक तर आपल्या पक्षात येण्याची ऑफर देतात नाहीतर शासकीय यंत्रणांचा गैरवापर करून विरोधी पक्षाची धरपकड करून त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली जाते. त्यामुळे कार्यक्षम विरोधी पक्षाच्या अभावामुळे राजकारणाचे स्वरूप बदलत आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये आपण राजकारणाचे बदलते स्वरूप पाहात आहोत. त्याचे सर्वात मोठे कारण जर काही असेल तर विभूतीपूजा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, जॉन स्टुअर्ट मिलने, लोकशाहीच्या पुरस्कर्त्यास व संरक्षकास दिलेल्या धोक्याच्या सूचनेचे परिपालन केले पाहिजे. मिलच्या मते, "मोठ्यातल्या मोठ्या माणसाच्या देखील चरणावर तुम्ही आपले स्वातंत्र्य अर्पिता कामा नये; अगर शासनसंस्थांचा तो दुरुपयोग करील एवढी सत्तादेखील त्याजकडे तुम्ही विश्वस्त म्हणून ठेवू नये." ज्यांनी आपली उभी हयात देश सेवेसाठी खर्ची घातली, त्या महापुरुषांना कृतज्ञ रहाण्यात काहीच चूक नाही. परंतु, कृतज्ञतेसही काही मर्यादा आहेत. याबाबत पॅनियल कॅनेल आयरिश देशभक्ताचे विचार ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो की, मोठ्या माणसांशी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जर एखाद्यास आपला स्वाभिमान गुंडाळून ठेवावा लागत असेल; अगर एखाद्या स्त्रीस तिचे शील भ्रष्ट करावे लागत असेल तर ते कसे शक्य आहे ? अगदी याच न्यायाने राष्ट्राचे स्वातंत्र्यच एखाद्या मोठ्या व्यक्तीकडे गहाण ठेवून कृतज्ञता व्यक्त करावयाची असेल तर तेही शक्य नाही.

या धोक्याच्या इशाऱ्याची आवश्यकता इतर देशापेक्षा आज भारतात अधिक आहे. कारण, भारतीय राजकारणात, भक्तीचा, निष्ठेचा अगर विभूतीपूजेचा जेवढा खेळ दिसतो त्याला जगातील विभूतीपूजेत कोठे तोडच सापडत नाही. धार्मिक भक्तीत आत्म्याची मुक्ती असू शकेल परंतु, राजकीय भक्तीमधून खात्रीलायक अधःपाताचा मार्ग आहे. त्यातूनच हुकूमशाही निर्माण होते.

निवडणूकांमध्ये सर्वांना समान संधी मिळावी यासाठी निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला प्रचाराला किती खर्च करावा याची मर्यादा घालून दिली आहे. अन्यथा श्रीमंत उमेदवारांकडून अधिक खर्च करून फायदा उचलला जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक राज्यानूसार ही खर्च मर्यादा निश्चित केलेली आहे. त्यामुळे निवडणूकीत पैशांचा पुर रोखण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या खर्चाची मोजणी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर लागलीच सरु होते. उमेदवार अर्ज भरल्यानंतर प्रत्येक उमेदवाराने डायरीत हा खर्च लिहून ठेवायचा असतो. निवडणूक प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर या खर्चाचा लेखाजोखा आयोगाला सादर करावा लागतो. २०१४ च्या लोकसभा निवडणूकापर्यंत खर्च मर्यादा विविध राज्यात ५४ लाख ते ७० लाख रुपयांपर्यंत होती. सन २०१९ पर्यंत ही मर्यादा कायम राहीली. त्यानंतर निवडणूक आयोगाने सन २०२० मध्ये याकामासाठी एक समिती नेमली. समितीच्या अहवालानूसार निवडणूक खर्च मयार्दा ७० लाख रुपये ते ९५ लाख रुपयांपर्यंत राज्यानूसार केली आहे. २०२४ ची लोकसभा निवडणूक मागील विक्रम मोडून जगातील सर्वात महागडी निवडणूक स्पर्धा ठरली. सेंटर फॉर मीडिया स्टडीजच्या मते, भारतात एका मताची किंमत आता आश्चर्यकारकपणे १,४०० रुपयांवर पोहोचली आहे. सत्ताधारी भाजपपासून ते विरोधी काँग्रेस आणि समाजवादी पक्षापर्यंत सर्व राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाहीत. अंदाजानुसार या निवडणुकीत सुमारे १ लाख कोटी रुपये खर्च झाले आहेत, जे २०१९ च्या निवडणुकीत खर्च झालेल्या ५५,०००-६०,००० कोटी रुपयांपेक्षा लक्षणीय वाढ आहे. महागडया निवडणूक स्पर्धेमुळे राजकारणाचे स्वरूप बदलत आहे.

भारतीय निवडणूक आयोगानुसार भारतात २००० हून अधिक राजकीय पक्ष आहेत, ज्यामध्ये आठ मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि पन्नास हून अधिक मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांचा समावेश आहे. मागील चार दशकांमध्ये, प्रादेशिक पक्षांची संख्या आणि ताकद वाढली होती. यामुळे भारतीय संसद राजकीयदृष्ट्या अधिक वैविध्यपूर्ण बनली होती. प्रादेशिक राजकीय पक्ष प्रादेशिक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी उदयास आले आहेत. लोकसभेत कोणताही एक राष्ट्रीय पक्ष स्वतःहून बहुमत मिळवू

शकत नाही. परिणामी, राष्ट्रीय पक्षांना राज्य पक्षांसोबत युती करावी लागत होती. सन १९८९ पासून प्रादेशिक राजकीय पक्षांनी युतीच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावण्यास सुरुवात केली. प्रादेशिक राजकीय पक्षांमुळेच आपली पक्षव्यवस्था संघराज्यीकृत झाली. केंद्राने त्यांच्या समस्या सोडवण्यास आणि त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यास सुरुवात केली होती. परंतु, सन २०१४ आणि २०१९ च्या दोन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये एकाच पक्षाला (भाजपा) स्वबळावर पूर्ण बहुमत मिळाले आणि त्यांनी २५ वर्षांच्या युती राजकारणाच्या सक्तींना मोडून काढले.

अलीकडच्या काळात देशभरात अनेक राज्यातील उदाहरणं पाहिली तर जे जे प्रादेशिक पक्ष भाजपाला डोईजड झाले किंवा त्यांची ताकद वाढली, त्या त्या पक्षांना एक तर केंद्रीय तपास यंत्रणेच्या माध्यमातून भीती दाखवली किंवा सत्तेचं गाजर दाखवून त्यांना जवळ करण्याची भाजपाची खेळी राहिलीय. त्यामुळं प्रादेशिक पक्ष हे भाजपाच्या दृष्टीने नगण्य ठरलेत. कारण भाजपाला जो जो विरोध करतोय किंवा डोईजड वाटतोय त्याला संपवण्याची ही भाजपाचे प्रवृत्ती आहे, असं 'ईटीव्ही भारत' शी बोलताना राजकीय विश्लेषक जयंत माईणकर यांनी म्हटलंय. महाराष्ट्रात ज्या शिवसेनेमुळं भाजपा मोठी झाली, रुजली आणि वाढली, त्याच शिवसेनेला फोडण्याचं काम भाजपाने केलं. शिवसेनेचे दोन तुकडे पडल्यानंतर राष्ट्रवादीचीही दोन तुकडे पडले आहेत. त्यामुळं महाराष्ट्रात भाजपाला टक्कर देतील, असे सध्यातरी प्रादेशिक फक्त उरलेले नाहीत. देशपातळीवरही अशीच स्थिती आहे. भाजपा काँग्रेसमुक्त करता करता प्रादेशिक पक्षमुक्त भारत करीत आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांची ताकद कमी- कमी होत जाऊन राजकारणाचे स्वरूप बदलत आहे.

**समारोप :**

सन २०१४ नंतरच्या निवडणुकांचा विचार केल्यास देशाच्या राजकारणाचा संपूर्ण कायापालटच झाला आहे. त्याचे सर्वात मोठे कारण जर काही असेल तर सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. राजकारण सध्या व्यावसायिकतेकडे जास्त प्रमाणात झुकत आहे. पक्षनिष्ठा, विचारधारा लोप पावताना दिसते आहे. भारतातील निवडणुकीच्या हंगामात गरिबांना मोफत भेटवस्तू देण्याच्या आश्वासनांचे वर्चस्व राहिले आहे. सरकारच्या अशा मोफत देणग्यांमुळे राज्य आणि देश अतिभारग्रस्त होत आहे. आपल्याला हव्या असणाऱ्या पदासाठी कधीही कोणत्याही पक्षामध्ये पक्षांतर करण्यासाठीही आताचे नेते आघाडीवर आहेत त्यात विभूतीपूजेला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. महागडया निवडणूक स्पर्धेमुळे राजकारणाचे स्वरूप बदलत आहे. आता भविष्यात हे बदललेले राजकारणाचे स्वरूप नक्की कुठे आणि कसे वळणार हे येणारा काळच ठरवेल.